राशिभविष्य

शुक्रवार १३ नोव्हेंबर २०२६

॥ पंचांग ॥

आज मिती कार्तिक शुद्ध चतुर्थी शके १९४८, चंद्र नक्षत्र मूळ. योग धृती ,चंद्र राशी धनु,भारतीय सौर २२ कार्तिक शके १९४८. शुक्रवार दिनांक १३ नोव्हेंबर २०२६. सूर्योदय ०६.४४ सूर्यास्त ०६.०० चंद्रोदय १०.९एएम चंद्रास्त ०९.०८ पीएम , राहू काळ १०.५८ ते १२.२२ , विनायक चतुर्थी,भद्रा वर्ज

॥ भविष्य ॥

मेष - नोकरदारांना दिलासा मिळेल.

वृषभ - कामानिमित्त लहान-मोठे प्रवास घडतील प्रवास कार्य सिद्ध राहतील.

मिथुन - भागीदारीच्या व्यवसायात प्रगती कराल.

कर्क - विविध क्षेत्रात प्रगती करण्याचा प्रयत्न राहील.

सिंह - दाम्पत्य सुख मिळेल.

कन्या - व्यवसाय धंद्यात नवीन संधी प्राप्त होतील.

तुळ- महत्त्वाच्या प्रश्नांचे उत्तर मिळेल.

वृश्चिक - मध्यस्ती यशस्वी होतील.

धनु - आपल्या दैनंदिन कामात कार्यमग्न राहाल.

मकर- कामाचा व्याप वाढल्यामुळे धावपळ करावी लागेल.

कुंभ - कुटुंबीयांसमवेत बाहेर जाण्याचे बेत आखाल.

मीन - नवीन नवीन आव्हाने स्वीकारावी लागतील.

पान १ वरून

मुंबई, पुणे, दिल्लीत बॉम्बस्फोटाच्या धमक्या

आणण्याचा इशारा देण्यात आला होता. या संदेशानंतर पुण्यातील सुरक्षा यंत्रणांनीही तपासणी सुरू केली.

दिल्लीतील शाळांनाही धमकी

दिल्लीतील द्वारका परिसरातील सेंट थॉमस स्कूल आणि वसंत व्हॅली स्कूलला बुधवारी (११ नोव्हेंबर) बॉम्बस्फोटाच्या धमकीचे ई-मेल प्राप्त झाले होते. त्यामुळे शाळांमध्येही खळबळ उडाली होती. मुंबई, पुणे आणि दिल्लीतील या घटनांच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. प्राथमिक तपासात धमक्या खोट्या असल्याचे आढळले असले, तरी ई-मेल पाठवणाऱ्यांचा शोध घेण्यासाठी सायबर पोलिसांकडून तपास सुरू आहे.

आपण निसर्गाचे मालक नाही, तर त्याचा एक भाग!

भारतीय परंपरेतील ज्ञानाचा अभ्यास करून त्याच्या आधारे जगाला विकासाचा नवा मार्ग दाखवण्याची गरज असल्याचे ते म्हणाले.

भाऊबीजेच्या पहाटे रत्नागिरीत आगीचे भीषण तांडव; महालक्ष्मी मिनी मॉल जळून खाक!

घातला. मॉलमध्ये प्लास्टिकच्या वस्तू, इलेक्ट्रॉनिक साहित्य आणि मोठ्या प्रमाणावर गिफ्ट आर्टिकल्स असल्याने आग वेगाने पसरली. आगीचे लोळ आणि धुराचे प्रचंड लोट दूरवरून दिसत होते. घटनेची माहिती मिळताच रत्नागिरी नगर परिषद, एमआयडीसी, फिनोलेक्स आणि आसपासच्या औद्योगिक वसाहतींमधील अग्निशमन यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेतली. तब्बल पाच ते सहा तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले.

पाण्याच्या तुटवड्याने अग्निशमन यंत्रणेची कसोटी

आग विझविताना पाण्याचा तुटवडा ही मोठी समस्या ठरली. पहिल्या अग्निशमन बंबात पुरेसे पाणी नसल्याची माहिती घटनास्थळी उपस्थित काही नागरिकांनी दिली. त्यानंतर सातत्याने पाण्याचा पुरवठा करण्यासाठी खासगी टँकरधारकही मदतीला धावले. देसाई टँकरवाले, नवलाई ग्रुप, राष्ट्रा पाटील, बाळूमामा प्रसन्न टँकरवाले यांच्यासह अन्य टँकरधारकांनी तातडीने पाण्याचे टँकर उपलब्ध करून दिले. नगर परिषद, एमआयडीसी आणि फिनोलेक्सच्या अग्निशमन पथकांनी प्रतिकूल परिस्थितीतही आगीशी झुंज दिली.

रत्नागिरीकरांची माणुसकी धावली मदतीला

या दुर्घटनेचे गांभीर्य ओळखून शेकडो नागरिक, व्यापारी आणि स्थानिक रहिवासी घटनास्थळी दाखल झाले. मॉलमधील उर्वरित साहित्य, महत्त्वाचे दस्तऐवज आणि लगतच्या दुकानांमधील माल सुरक्षित ठिकाणी हलविण्यासाठी नागरिकांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून मदत केली. आगीचा धोका दैनिक सागरच्या कार्यालयासह लगतच्या दुकानांपर्यंत पोहोचला. दैनिक सागर कार्यालयातील काही इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे नुकसान झाले, मात्र महत्त्वाचे दस्तऐवज सुरक्षित राहिले. रत्नागिरी जिल्हा महिला सहकारी पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयालाही आगीचा धोका निर्माण झाला होता. अग्निशमन जवानांच्या प्रयत्नांमुळे परिसरातील अनेक दुकाने आणि कार्यालयांचे मोठे नुकसान टळले.

२९ वर्षांपूर्वीच्या आगीच्या आठवणी जाग्या

या दुर्घटनेने १९९७ मध्ये रक्षाबंधनाच्या दिवशी राम आळी आणि राधाकृष्ण नाका परिसरात लागलेल्या भीषण आगीच्या कटू आठवणी पुन्हा जाग्या झाल्या. त्यावेळीही व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. तब्बल २९ वर्षांनंतर पुन्हा सणाच्या दिवशी बाजारपेठेला आगीचा मोठा फटका बसल्याने व्यापारीवर्गात हळहळ व्यक्त होत आहे. महालक्ष्मी मिनी मॉलचे मालक मयूर खानविलकर, नितीन लाखण, मिनल खानविलकर यांच्यासह अन्य व्यावसायिकांचे अश्रू पाहून उपस्थितांची मने हेलावली.

आमदार किरण सामंत यांची घटनास्थळी धाव

आगीची माहिती मिळताच लांजा-राजापूरचे आमदार किरण सामंत यांनी घटनास्थळी धाव घेऊन परिस्थितीची पाहणी केली. प्रांताधिकारी जीवन देसाई यांनी प्रशासकीय यंत्रणेसह मदतकार्याची सूत्रे हाती घेतली. पोलीस निरीक्षक विवेक पाटील आणि त्यांच्या पथकाने गर्दीवर नियंत्रण ठेवत परिसरात सुरक्षिततेच्या दृष्टीने व्यवस्था केली. आग विझविण्यासाठी अग्निशमन दलातील जवानांनी जीवाची बाजी लावत केलेले प्रयत्न कौतुकास्पद ठरले. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. आग आटोक्यात आल्यानंतरही कुलिंग ऑपरेशन सुरू होते. या दुर्घटनेमुळे ऐन दिवाळीत व्यापाऱ्यांच्या व्यवसायावर आणि संसारावर मोठे संकट कोसळले आहे.

श्री महालक्ष्मी मिनी मॉलच्या आगीचे तातडीने सर्वेक्षण करण्याचे पालकमंत्री सामंत यांचे विमा

उद्या शनिवार दि. १४ नोव्हेंबर रोजी सायं. ७ वा.
प्रचंड लोकप्रिय आणि सर्वाधिक मागणी असलेला शो प्रथमच रत्नागिरीत!


कंपनीला निर्देश

असे पालकमंत्र्यांनी सांगितले. अग्निशमन दलाने चार ते पाच तास अथक परिश्रम घेत १० ते १५ बंबांच्या साहाय्याने या भीषण आगीवर नियंत्रण मिळवले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचे त्यांनी नमूद केले.

लगतच्या दुकानाचेही स्वतंत्र सर्वेक्षण होणार

सणासुदीच्या काळात वर्षानुवर्षांच्या कष्टातून उभा केलेला व्यवसाय आगीच्या भक्ष्यस्थानी पडणे ही अत्यंत वेदनादायी बाब असून, या संकटातून दुकानदारांना पुन्हा ताकदीने उभे करणे ही आपलीही जबाबदारी असल्याची भावना पालकमंत्री डॉ. सामंत यांनी व्यक्त केली. विमा कंपन्यांना तातडीने पंचनामे व सर्वेक्षण करण्याच्या सूचना देतानाच, या आगीची झळ बसलेल्या मॉललगतच्या आणखी एका दुकानाचेही स्वतंत्र सर्वेक्षण करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत.

तीन-चार दिवसांत मॉल पुन्हा सेवेत; अग्निसुरक्षेच्या सूचना

या दुर्घटनेनंतर आवश्यक त्या उपाययोजना व दुरुस्तीची कामे गतीने पूर्ण करून येत्या तीन ते चार दिवसांत 'श्री महालक्ष्मी मिनी मॉल' पुन्हा नागरिकांच्या सेवेत सुरू करण्याचा मानस पालकमंत्र्यांनी व्यक्त केला. भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी आवश्यक अग्निसुरक्षा आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना काटेकोरपणे राबविण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित यंत्रणांना दिल्या.

आगीने दुकानांचे आर्थिक नुकसान झाले असले, तरी व्यापाऱ्यांची जिद्द आणि पुन्हा उभे राहण्याचा आत्मविश्वास कमी होता कामा नये. या कठीण प्रसंगी शासन व मी स्वतः व्यावसायिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, त्यांचा व्यवसाय पुन्हा पूर्ववत सुरू करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य आणि पाठपुरावा केला जाईल, असा विश्वास पालकमंत्री डॉ. उदय सामंत यांनी यावेळी दिला.

व्यापारी संकुलांमध्ये अग्निसुरक्षा यंत्रणा बंधनकारक करा - मंत्री सामंत

महालक्ष्मी मॉलमधील आगीच्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर शहरातील अन्य व्यापारी संकुलांनीही अग्निसुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे. नगरपालिका आणि शासनाकडून अपेक्षा करतानाच व्यापाऱ्यांनीही स्वतःच्या मालमत्तेच्या सुरक्षेची जबाबदारी ओळखून स्वयंस्फूर्तीने पुढाकार घेतला पाहिजे, असे प्रतिपादन पालकमंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेत केले.

व्यापारी संकुलांमध्ये आग प्रतिबंधक आधुनिक यंत्रणा बसविण्यावर भर देताना मंत्री सामंत म्हणाले की, सध्या स्प्रिंकलर ही अत्याधुनिक अग्निसुरक्षा यंत्रणा उपलब्ध आहे. साधारण पाच ते सहा लाख रुपये खर्चून ही यंत्रणा बसविता येऊ शकते. आग लागल्यास ही यंत्रणा तत्काळ कार्यान्वित होऊन आगीवर नियंत्रण मिळविण्यास मदत करते. त्यामुळे संपूर्ण दुकान, व्यापारी संकुल किंवा घराचे मोठे नुकसान टाळणे शक्य होऊ शकते. नवीन इमारती आणि व्यापारी संकुलांच्या बांधकामांमध्ये नगरपालिका प्रशासनाने अशा अग्निसुरक्षा यंत्रणा बसविणे बंधनकारक करण्याबाबत विचार करावा. त्याचबरोबर अस्तित्वात असलेल्या व्यापारी संकुलांनीही सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे त्यांनी सांगितले.

जि. प. शिक्षकांच्या पदोन्नतीला तूर्त स्थगिती

चर्चा करण्यासाठी राज्यमंत्री भोयर यांच्या प्रमुख उपस्थितीत मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीला शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन आणि मोईन ताशीदार यांच्यासह शिक्षक परिषदेचे पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत पदोन्नती प्रक्रियेबरोबरच शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या हिताशी संबंधित २८ प्रमुख मागण्यांवर चर्चा करण्यात आली. शिक्षकांवरील अशासकीय कामांचा अतिरिक्त भार कमी करण्याबाबत राज्यमंत्र्यांनी विशेष निर्देश दिले. प्रत्येक केंद्र शाळेत कंत्राटी पद्धतीने डेटा एंट्री ऑपरेटर नेमण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचेही बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

जम्मू काश्मीरमध्ये चाळण झालेल्या अवस्थेत आढळले पोलिसांचे मृतदेह

किश्तवाडमधील कियार गावाजवळ या दोन्ही अधिकाऱ्यांचे मृतदेह आढळले. त्यापैकी एका अधिकाऱ्याच्या डोक्यात, तर दुसऱ्याच्या पाठीत गोळी झाडण्यात आल्याचे समोर आले आहे. दोघांच्या मृतदेहांवर अनेक गोळ्या झाडण्यात आल्या होत्या. हत्या केल्यानंतर दहशतवाद्यांनी त्यांच्याकडील रायफल्सही पळविल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. हे दोघेही पोलीस कियार छावणीतून ढारना-मारवाह येथील लष्करी चौकीकडे निघाले होते. मात्र, ते नियोजित ठिकाणी पोहोचले नाहीत. त्यांच्याशी मोबाइलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला; परंतु मोबाइल बंद लागले. त्यानंतर पोलिसांनी शोधमोहीम हाती घेतली. या शोधमोहिमेदरम्यान दोघांचे मृतदेह आढळून आले.

नवजात बाळाच्या खरेदीप्रकरणी रत्नागिरीतील शुभम कीरला अटक; ६.५ लाखांत केला व्यवहार!

हे बाळ खरेदी केल्याचे समोर आले आहे. नातेवाईकांकडून होणाऱ्या टोमण्यांना कंटाळून त्याने कायदेशीर मार्गाने मुलगा दत्तक घेण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, दत्तक प्रक्रियेतील क्लिष्टतेमुळे त्याला यश आले नाही. त्यानंतर तो मध्यस्थांच्या जाळ्यात अडकला, अशी कबुली त्याने पोलिसांना दिल्याचे वृत्त आहे.

या प्रकरणाचा तपास करताना मुंब्रा पोलिसांनी रत्नागिरीत धाव घेत शुभम कीर याला अटक केली आणि बाळाची सुखरूप सुटका केली. यापूर्वी ज्योती पाटील, रेहान शेख, फरहान शेख, फरिदा सय्यद, हुस्ना शेख यांच्यासह अनिता धोत्रे, सुनीता खैरनार, गोपीनाथ धोत्रे, प्रतिभा परब आणि शिल्पा साठे यांना अटक करण्यात आली होती. आता खरेदीदारालाही बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.

अटक करण्यात आलेल्या सर्व ११ आरोपींची न्यायालयाने न्यायालयीन कोठडीत रवानगी केली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश जवादवाड यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी पोलीस निरीक्षक वृषाली पवार या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत. या बालविक्री रॅकेटचा मुख्य सूत्रधार प्रवीण साळुंखे याला अटक करण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर कायम आहे.

रत्नागिरीत दोन फाईव्ह स्टार हॉटेलच्या माध्यमातून ७०० जणांना रोजगार

आहे. त्यामुळे डायलिसिस रुग्णांनी चिंता करण्याचे कारण नाही, असे सामंत यांनी स्पष्ट केले.

जिल्ह्यात डायलिसिससाठी पाच युनिट कार्यरत असून लांजासह अन्य ठिकाणीही ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. काही डायलिसिस युनिटचे व्यवस्थापन एचएलएल या कंपनीकडे केंद्रीकृत पद्धतीने सोपविण्यात आले आहे. कंपनीच्या अखत्यारितील पाचही युनिटच्या कामकाजाबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. कंपनीच्या प्रतिनिधींना जिल्ह्यातील रुग्णांची गरज आणि डायलिसिस सेवेचे महत्त्व प्रशासनाने स्पष्ट केले असून, कंपनीने याबाबत निर्णय घेण्यासाठी आठ दिवसांची मुदत मागितली आहे.

या प्रश्नावर जिल्हा प्रशासनाने पर्यायी व्यवस्थाही सज्ज ठेवली आहे. जिल्ह्यातील पाचही डायलिसिस केंद्रांवर स्थानिक तंत्रज्ञ उपलब्ध असल्याने बाहेरून मनुष्यबळ आणण्याची आवश्यकता भासणार नाही, ही या व्यवस्थेची सर्वात मोठी जमेची बाजू आहे.

विमानतळाच्या टर्मिनल इमारतीचे काम पूर्ण

रत्नागिरी विमानतळावरील टर्मिनल इमारतीचे काम पूर्ण झाले असून नियमित विमानसेवा सुरू करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण प्रगती झाली आहे. या पार्श्वभूमीवर जानेवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत विमानसेवा सुरू होण्याचे संकेत मंत्री सामंत यांनी दिले आहेत. त्यामुळे रत्नागिरीकरांचे नियमित विमानसेवेचे स्वप्न लवकरच प्रत्यक्षात उतरण्याचे संकेत उद्योगमंत्री तथा पालकमंत्री उदय सामंत यांनी दिले.

बचत गटांना वाहनांचे वाटप, भाट्ये येथे बोट टर्मिनल उभारणार

तर महिला बचत गटांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी डीपीसीच्या माध्यमातून वाहनांचे वाटप करण्यात आले आहे. आतापर्यंत पाच ते सहा वाहने बचत गटांना देण्यात आली असून, महिला अत्यंत चांगल्या पद्धतीने ही वाहने चालवत आहेत. मच्छीमारांच्या अडचणी लक्षात घेऊन भाट्ये येथे बोट टर्मिनल उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाणार असून, आउटसोर्सिंगच्या माध्यमातून महिला बचत गटांना भागीदारी देऊन बोट सेवा सुरू करण्याचा मानस असल्याचे सामंत यांनी स्पष्ट केले.

सिंधुरत्न योजनेच्या निधीबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, यापूर्वी तीन वर्षांत दरवर्षी ५० याप्रमाणे १५० बोटी देण्याचे नियोजन होते. मात्र, नव्या टप्पा धोरणामुळे अपेक्षित संख्येने बोटी उपलब्ध होऊ शकल्या नाहीत. या योजनेतून ८५ कोटी रुपयांची कामे झाली असून, अखर्चित राहिलेला १० कोटी रुपयांचा निधी पुन्हा डीपीसीकडे घेण्यात आला आहे. या निधीतून आता नवीन विकासकामे हाती घेण्यात येणार आहेत.

विलीनीकरण किंवा आमदार फुटीच्या चर्चांमध्ये तथ्य नाही - प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे

फडणवीस यांची भेट घेतली होती. त्याआधी १० नोव्हेंबरला त्यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याशी दीड तास चर्चा केली होती. या भेटींमुळे राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या विलिनीकरणाबाबत राजकीय वर्तुळात तर्कवितर्क सुरू झाले होते. या पार्श्वभूमीवर तटकरे यांनी गुरुवारी माध्यमांशी बोलताना भेटीमागील भूमिका स्पष्ट केली. मुख्यमंत्र्यांना दिवाळीच्या शुभेच्छा देण्याबरोबरच रोहा येथे ५५ कोटी रुपये खर्चून उभारण्यात येणाऱ्या आधुनिक रेल्वे स्थानकाच्या भूमिपूजनासाठी उपस्थित राहण्याचे निमंत्रण दिले. तसेच श्रीवर्धन येथे मंत्री आदिती तटकरे यांच्या प्रयत्नांतून उभारण्यात आलेल्या श्रीमंत बाजीराव पेशवे यांच्या स्मारकाच्या लोकार्पणासाठीही मुख्यमंत्र्यांनी यावे, अशी विनंती केल्याचे त्यांनी सांगितले. राष्ट्रवादीचे काही आमदार शरद पवार यांच्या भेटीसाठी वेळ मागत असल्याच्या वृत्ताबाबत विचारले असता, 'मला या संदर्भात माहिती नाही,' असे तटकरे म्हणाले. मात्र, शरद पवार यांनी सहा दशकांहून अधिक काळ राज्य आणि देशाच्या राजकारणात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांनी अनेकांना राजकारणात घडवले आहे. त्यामुळे त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी पक्षातील आमदार किंवा कार्यकर्ते भेटायला गेले, तर त्यात गैर काय? मी मुंबईत असेन, तेव्हाही त्यांची भेट घेऊन प्रकृतीची विचारपूस करणार आहे. ही महाराष्ट्राची संस्कृती आहे, असे तटकरे यांनी स्पष्ट केले.

'जर-तर'ला अर्थ नसतो

विलिनीकरणाबाबत सुनेत्रा पवार यांनी अलीकडेच 'जशी वेळ येईल, तशा गोष्टी कळतील,' असे विधान केले होते. त्यावरून विलिनीकरणाच्या चर्चांना पुन्हा हवा मिळाली होती. मात्र, या विषयावर सध्या कोणती चर्चा सुरू आहे, असे आपल्याला वाटत नसल्याचे तटकरे यांनी सांगितले. शरद पवार यांनी काय बोलावे किंवा बोलू नये, हा त्यांचा अधिकार आहे. त्यामुळे 'जर-तर'च्या शक्यतांवर चर्चा करण्यात अर्थ नसल्याचेही त्यांनी नमूद केले.

एनव्हीडियाच्या समभागात ८ टक्क्यांची घसरण

एनव्हीडियाच्या समभागात ८.६ टक्क्यांची मोठी घसरण झाली. गेल्या ३३ वर्षांपासून कंपनीचे नेतृत्व करणाऱ्या हुआंग यांची उचलबांगडी झाल्यास मोठी पोकळी निर्माण होईल, या भीतीने गुंतवणूकदारांमध्ये अस्थिरता पसरली आहे. यामुळे कंपनीच्या बाजार मूल्यात तब्बल ६०० अब्ज डॉलर्सची घट झाली आहे. या नेतृत्व संकटाचा फायदा प्रतिस्पर्धी कंपन्यांना मिळत असून, 'एएमडी' च्या समभागात ११ टक्क्यांहून अधिक उसळी पाहायला मिळाली आहे. दरम्यान, १७ नोव्हेंबर रोजी एनव्हीडियाचे तिमाही निकाल जाहीर होणार असल्याने संपूर्ण जगाचे लक्ष या घडामोडींकडे लागले आहे.

देवरूखात ऐन दिवाळीत चोरट्यांचा धुमाकूळ

सोन्या-चांदीचे दागिने तसेच रोकड चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. या चोरीमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, देवरूख पोलिसांसमोर या घरफोडीचा छडा लावण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. दरम्यान, याप्रकरणी देवरूख पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. देवरूख बागवाडी परिसरात घडलेल्या या घरफोडीच्या घटनेने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. अज्ञात चोरट्यांनी घरातील मौल्यवान वस्तूंवर डल्ला मारत सोन्या-चांदीचे दागिने आणि रोकड लंपास केली. चोरीस गेलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत व रोकड मिळून अशी ३ लाख ५१ हजार ९०० रूपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला आहे. देवरूख बागवाडी येथे घडलेल्या या घरफोडीमुळे परिसरातील नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. घरात मौल्यवान दागिने व रोकड ठेवणे कितपत सुरक्षित आहे, असा प्रश्न नागरिकांना पडू लागला आहे. विशेषतः घर बंद ठेवून बाहेर जाणाऱ्या नागरिकांच्या घराच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी परिसरात गस्त वाढवावी, संशयास्पद व्यक्तींच्या हालचालींवर लक्ष ठेवावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. याबाबत देवरूख पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या तक्रारीनुसार, योगिता रवींद्र फेफडे (वय ४०, रा. श्रीराम नारायण कदम यांचे भाड्याचे घर, बागवाडी, ता. संगमेश्वर) यांच्या घराच्या मागील दरवाजाचे कुलूप अज्ञात चोरट्याने कोणत्यातरी कठीण हत्याराने उचकटून घरात प्रवेश केला. त्यानंतर हॉलमधील लोखंडी पत्र्याच्या कपाटातील लॉकर फोडून त्यामधील सोन्या-चांदीचे दागिने तसेच रोख रक्कम चोरून नेली. चोरीस गेलेल्या ऐवजात ६० हजार रुपये किंमतीचा सोन्याचा हार, ८० हजार रुपयांचा सोन्याचा हार, सोन्याचे कानातले, चांदीचे पैंजण, बाळाच्या चांदीच्या बाळ्या, चांदीची जोडवी, वाटी, ब्रेसलेट, मंगळसूत्र यांसह १ लाख ७० हजार रुपयांची रोकड असा एकूण ३ लाख ५१ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेला आहे. दरम्यान देवरूख पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून चोरट्याचा शोध देवरूख पोलीस घेत आहेत.

नायरीतील ९१ वर्षीय वृद्धेच्या मृत्यू प्रकरणी सुनेला अटक; पाच दिवसांची पोलीस कोठडी

दुखापत झाली होती. त्यांची मुलगी जैबुनिसा निजामुद्दीन लांबे (वय ६०, रा. नेरूळ, नवी मुंबई) यांनी संगमेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. उपचारादरम्यान जुलेखा मोडक यांचा मृत्यू झाला. वृद्धेच्या मृत्यूनंतर संशयित सून पोलिसांना मिळून येत नव्हती. बुधवारी पहाटेपासून पोलिसांनी तिचा शोध सुरू केला. अखेर सकाळी सुमारे दहा वाजण्याच्या सुमारास हेड कॉन्स्टेबल विनय मनवल, हेड कॉन्स्टेबल क्रांती सावंत आणि पोलीस हवालदार भोसले यांनी तिला ताब्यात घेतले. त्यानंतर कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून अटक करण्यात आली. या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१), ११८(२), ११८(१) आणि ११५(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. न्यायालयाने आरोपी महिलेला पाच दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली असून, कोठडीची मुदत संपल्यानंतर सोमवारी देवरुख न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक नितीन बगाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मितेश किणी पुढील तपास करीत आहेत. दरम्यान, वृद्धेच्या मृत्यूचे नेमके वैद्यकीय कारण आणि कथित मारहाणीचा मृत्यूशी असलेला संबंध तपासातून स्पष्ट होणार असून, या प्रकरणाकडे नायरी परिसराचे लक्ष लागले आहे.

महाराष्ट्राने प्रथमच मिळवला जागतिक सन्मान : कोकणच्या पर्यटनाला आंतरराष्ट्रीय ओळख

ऐतिहासिक उपलब्धी मानली जात आहे. समुद्रकिनाऱ्यांची स्वच्छता, समुद्राच्या पाण्याची गुणवत्ता, पर्यावरण संवर्धन, जैवविविधतेचे संरक्षण, पर्यटकांची सुरक्षितता, अत्याधुनिक पायाभूत सुविधा आणि शाश्वत पर्यटन व्यवस्थापन अशा कठोर आंतरराष्ट्रीय निकषांची पूर्तता केल्यामुळे या तिन्ही किनाऱ्यांना हा बहुमान मिळाला आहे. त्यामुळे लाडघर आणि गुहागर या रत्नागिरी जिल्ह्यातील पर्यटनस्थळांची ओळख आता केवळ देशापुरती मर्यादित न राहता जागतिक स्तरावर पोहोचणार आहे. या मानांकनामुळे देश-विदेशातील पर्यटकांचा कोकणातील समुद्रकिनाऱ्यांकडे ओढा वाढण्याची अपेक्षा आहे. पर्यटन व्यवसाय, हॉटेल्स, निवास व्यवस्था, स्थानिक व्यावसायिक तसेच विविध सेवा क्षेत्रांना याचा मोठा लाभ होऊ शकतो. परिणामी स्थानिक पातळीवर रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होण्यासह कोकणच्या अर्थव्यवस्थेलाही बळ मिळण्याची शक्यता आहे. नव्याने मानांकन प्राप्त झालेल्या तिन्ही समुद्रकिनाऱ्यांचा ब्ल्यू फ्लॅग पर्यटन हंगाम १५ नोव्हेंबर २०२६ पासून सुरू होणार आहे. या पुरस्काराचे प्रतीक असलेला आंतरराष्ट्रीय ब्ल्यू फ्लॅग नेदरलँड्समधून प्राप्त होणार असून, त्यानंतर संबंधित विभाग आणि जिल्हा प्रशासनाच्या समन्वयातून ध्वजारोहण कार्यक्रमाचे नियोजन करण्यात येणार आहे.

या यशामागे राज्य शासनाचा पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, पर्यटन विभाग, जिल्हा प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायती, बीच मॅनेजमेंट कमिटी आणि स्थानिक नागरिकांचे सामूहिक योगदान महत्त्वपूर्ण ठरले आहे. पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी या यशाबद्दल आनंद व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण संरक्षण आणि विकास यांचा समतोल साधत राज्य शासन प्रयत्नशील असल्याचे त्यांनी नमूद केले. लाडघर आणि गुहागरच्या किनाऱ्यांना मिळालेला हा जागतिक सन्मान म्हणजे कोकणच्या पर्यटन क्षमतेवर उमटलेली आंतरराष्ट्रीय मोहोर आहे. निसर्गसौंदर्याचे जतन, स्वच्छतेचा ध्यास आणि पर्यावरणपूरक पर्यटनाची दिशा यांची सांगड घातल्यास कोकण जागतिक पर्यटनाचे आकर्षण ठरू शकते, याचीच या मानांकनाने प्रचिती दिली आहे.

स्वच्छतेच्या राष्ट्रीय स्पर्धेत रत्नागिरी शहर देशात तिसरे; राष्ट्रपतींच्या हस्ते गौरव !

मेहनत घेणाऱ्या स्वच्छता कर्मचाऱ्यांचे या यशातील योगदान मोलाचे आहे. प्रत्यक्ष तसेच अप्रत्यक्षरीत्या सहकार्य करणाऱ्या सर्व घटकांमुळेच रत्नागिरीला हा राष्ट्रीय बहुमान मिळवता आला आहे.

विशेषतः स्वच्छता कर्मचारी हेच या यशाचे खरे शिल्पकार असल्याची भावना नगराध्यक्षांनी व्यक्त केली. या ऐतिहासिक यशाबद्दल रत्नागिरी शहर आणि संपूर्ण कोकण पट्ट्यातून नगर परिषद प्रशासन, सर्व पदाधिकारी व स्वच्छतादूतांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

युनिटी स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड
UNITY Small Finance Bank
नोंदणीकृत कार्यालय : युनिट क्र. १२०१, १२०३ व १२०३, १२ वा मजला, अंसल भवन, १६, के. जी. मार्ग, नवी दिल्ली - ११०००१ • कॉर्पोरेट कार्यालय : सेट्रम हाऊस, विद्यानगरी मार्ग, कलिना, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - ४०००९८

तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांच्या विक्रीसाठी लिलाव सूचना

खाली नमूद केलेल्या कर्जदाराने/कर्जदारांनी युनिटी स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड (यापुढे "**बँक**") कडून सोन्याच्या तारणावर सुवर्णकर्ज सुविधा घेतली होती. संबंधित कर्जदारांनी देय हप्ते आणि थकबाकीची परतफेड करण्यात कसूर केल्यामुळे त्यांची कर्जखाती थकीत झाली आहेत आणि/किंवा अनुत्पादक मालमत्ता म्हणून वर्गीकृत करण्यात आली आहेत. बँकेने वारंवार सूचना व स्मरणपत्रे पाठवूनही कर्जदारांनी थकबाकीची परतफेड करून कर्जखाती नियमित केलेली नाहीत. त्यामुळे लागू कायद्यानुसार तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणे बँकेस भाग पडले आहे.

संबंधित कर्जदारांना आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सूचित करण्यात येते की, बँक खाली नमूद केलेल्या दिवशी व वेळी तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव काटेकोरपणे "जसे आहे तसे" या तत्त्वावर आयोजित करणार आहे.

लिलाव दिनांक : २३-११-२०२६ **वेळ : सकाळी ११.०० वाजता**

कर्ज खाते क्रमांक	ग्राहकाचे नाव	राज्य	ठिकाण	एकूण वजन (ग्रॅम)
यूएसएफबी२६२ सीआरएनए